भारत सरकार, गृह मंत्रालय
Government of India, Ministry of Home Affairs
जनगणना कार्य निदेशालय, महाराष्ट्र
Directorate of Census Operations, Maharashtra
एक्सचेंज बिल्डिंग, २सरी मंजिल,सर शिवसागर रामगुलाम मार्ग
Exchange Building, 2nd Floor,SirShivsagarRamgulamMarg
बेलार्ड एस्टेट, मुंबई-400001
Ballard Estate,Mumbai-400001
Tel./Fax : 22691266 Tel.: 22615494, E-mail : dco-mah.rgi@censusindia.gov.in

क्र. महा/जग/2021/परिपत्रक 8

दिनांक : 10/ 02/ 2020

# भारताची जनगणना 2021

## परिपत्रक क्र. 4

विषय :- घरयादी गट तयार करणे आणि घरयादी कार्याच्या वेळी घरांना क्रमांक देण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अद्ययावत करण्यासह घरयादी कार्य राज्यात दि. 1 मे 2020 ते 15 जून 2020 या 45 दिवसांच्या कालावधीत केले जाईल. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना 31.12.2019 पर्यंत सर्व प्रशासकीय घटकांच्या सीमा गोठविण्याची तसेच 1 जानेवारी 2020 ते 31 मार्च 2021 पर्यंत म्हणजेच जनगणना प्रक्रिया संपेपर्यंत सीमांमध्ये कोणतेही बदल करण्यात येऊ नये, अशी विनंती करण्यात आली आहे.

2. प्रत्येक राज्य / केंद्रशासित प्रदेशांकडे जेथे घरयादी आणि घरगणना केली जाणार आहे अशा सर्व प्रशासकीय घटकांची संपूर्ण आणि अंतिम यादी असू शकते. जे प्रगणक घरयादी कार्याचे काम करतील त्यांच्याकडे साधारणतः समान कार्यभार आहे याची खात्री करणे आवश्यक आहे. घरयादीच्या उद्देशासाठी गट तयार करण्याच्या प्राथमिक परंतु महत्वपूर्ण टप्प्यातून हे साध्य केले जाते. 'गट' म्हणजे गावातील किंवा शहराच्या एका प्रभागामधील परिभाषित क्षेत्र ज्याचे जमीनीवर स्पष्टपणे सीमांकन केलेले असते आणि ज्यासाठी एक ढोबळ नकाशा (Notional Map) जनगणना कार्याच्या उद्देशाने काढला जातो. घरयादी कार्य (HLO) आणि लोकसंख्या गणना (PE) यासाठी तयार केलेल्या अशा गटांना अनुक्रमे घरयादी गट व प्रगणक गट असे म्हटले जाते. घरयादी गट (HLB) / प्रगणक गट (EB) सर्वात लहान प्रशासकीय घटक असेल आणि क्षेत्र कार्य संपल्यानंतर माहिती संकलनाचा पाया तयार होईल.

3. जनगणना 2021 साठी चार्ज (तहसील किंवा शहर) मधील घरयादी गट संबंधित चार्ज अधिकाऱ्यांनी तयार करावयाचे आहे. घरयादी गट तयार करताना गाव किंवा शहरातील प्रभागाची सध्याची अंदाजित लोकसंख्या आणि प्रगणकाच्या सर्वसाधारण कार्यभार विचारात घेणे आवश्यक आहे. जनगणना 2021 साठी प्रगणकाचा सर्वसाधारण कार्यभार हा ग्रामीण व शहरी अशा दोन्ही क्षेत्राकरिता साधारणतः 650-800 लोकसंख्या किंवा 150-180 गणना घरे यापैकी जो जास्त आहे तो निश्चित केला गेला आहे. कोणतेही गाव किंवा कोणत्याही शहराच्या वॉर्डाची सध्याची अंदाजित लोकसंख्या 800 पर्यंत किंवा 180 गणना घरे असल्यास एक घरयादी गट तयार करावा. घरयादी आणि घरगणनेसाठी गट करतांना विचारात घ्यावयाच्या बाबींची चर्चा पुढील परिच्छेदांत केली आहे.

**<u>ग्रामीण भाग</u>**

4. जनगणना कार्यात महसूली गाव हा पायाभूत घटक आहे. महसूली गावातील सर्व निवासी वस्त्यांचा पूर्ण समावेश झाला आहे याची खात्री घरयादी गट तयार करतांना करावी. गावाची लोकसंख्या हा घटक विचारात न घेता, गावात किमान एक घरयादी गट तयार करावयाचा आहे. काही महसुली गावांची लोकसंख्या फारच कमी किंवा शून्य (निर्जन) सुद्धा असू शकते. अशा प्रत्येक गावाचा स्वतंत्र घरयादी गट (HLB) तयार करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत दोन गावांचे भाग घेवून एक घरयादी गट स्थापन करू नये. एका प्रगणकाला एका पेक्षा जास्त घरयादी गट दिले जाऊ शकतात जेणेकरून 650-800 लोकसंख्या किंवा 150-180 गणना घरे यापैकी जे जास्त आहे तो कार्यभार तिला किंवा त्याला द्यावा. अशा परिस्थितीत प्रगणकास दिलेल्या प्रत्येक घरयादी गटाचा तपशील वेगवेगळा ठेवला आहे, याची खात्री करून घेतली पाहिजे.

5. जर गावाची लोकसंख्या जास्त असेल म्हणजेच प्रगणकाच्या सर्वसाधारण कार्यभारापेक्षा जास्त असेल तर एकापेक्षा जास्त घरयादी गटांमध्ये त्याचे विभाजन केले जाऊ शकते, गावाची लोकसंख्या आणि कार्यभारानुसार प्रगणकांची नेमणूक करावी. अशा परिस्थितीत गावातील नैसर्गिक सीमा जसे रस्ता, कालवा इ. संबंधित प्रगणकास स्पष्टपणे ओळखता यावे म्हणून घरयादी गटांच्या सीमा म्हणून घ्याव्यात. असे प्रत्येक गट स्वतंत्र प्रगणकाला दिले जावेत. एकदा घरयादी गटांची निर्मिती झाल्यानंतर घरयादी कार्यासाठी त्याला / तिला दिलेल्या गटाची (किंवा गटांची) भौगोलिक सीमांची स्पष्ट कल्पना प्रगणकास असायला हवी.

6. काही बाबतीत असे दिसून येते कि गावातील काही भाग दोन किंवा जास्त ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असतात. गावातील घरयादी गट तयार करताना हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे कि ग्रामपंचायत सीमा व मतदान प्रभाग (पोलिंग बूथ) सीमा शक्यतो तशीच ठेवावी. या कामासाठी गावातील मतदान आधिकाऱ्याची मदत घ्यावी. मतदान कक्ष अधिकाऱ्याची (BLO) प्रगणक म्हणून नेमणूक झाली नाही, याची खात्री करून घ्यावी. काही वेळा मतदान प्रभाग दुसऱ्या गावात विभागला गेला असल्यास (Spill

over) त्या गावातील त्या भागाकरीता स्वतंत्र प्रगणक गट तयार करावा. मतदान कक्ष क्रमांक व मतदान कक्ष अधिकारी यांचे नाव चार्ज रजिस्टरच्या शेरा या रकान्यात सविस्तर नोंदवावे. चार्ज अधिकारीच सहायक निवडणूक नोंदणी अधिकारी सुद्धा आहे. मतदान कक्षासंबधीची सर्व माहिती चार्ज कार्यालयात उपलब्ध असते. पंचायत सीमांबाबतची माहिती गटविकास अधिकारी (BDO) यांच्याकडून मिळेल. त्याचप्रमाणे तहसिलच्या सीमा भेदून कोणतेही घरयादी गट तयार झाले नाहीत याची चार्ज अधिकाऱ्यांनी खात्री करणे आवश्यक आहे. जर एखादे गाव एकापेक्षा जास्त तहसिलमध्ये विभागले जात असेल तर प्रत्येक तहसिलच्या स्वतंत्र भागाकरिता घरयादी गट तयार करणे आवश्यक आहे.

7. वनक्षेत्र परिसरामध्ये निवासी घरे असतात पण ती घरे महसुली गावाच्या क्षेत्रात येत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये या वस्त्यांच्या रचनेनुसार (Settlement pattern) व लघुत्तम वन प्रशासकीय भागाच्या आधारे घरयादी गट तयार करावा. अशा क्षेत्राची माहिती जिल्हा वन अधिकारी किंवा त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडून घ्यावी.

8. सहा किंवा सहापेक्षा जास्त सलग घरयादी गट जे साधारणतः सहा प्रगणकास वाटप करावयाचे आहेत. अशा सहा किंवा त्यापेक्षा जास्त प्रगणक गटांचे पर्यवेक्षकीय मंडळ तयार होईल. यासाठी एक पर्यवेक्षक नेमला जाईल. हे घरयादी गट एका गावाचे असतील किंवा एकापेक्षा जास्त गावांचे सुद्धा असू शकतील. प्रत्येक घरयादी गटाच्या सीमा सुस्पष्ट असल्या पाहिजे. एखाद्या गावात शेतजमिनीच्या भागात विखुरलेल्या वस्त्या असू शकतात परंतु मुख्य गावाच्या घरयादी गटामध्ये समावेश नसतो. अशा वस्त्यांचा (Habitation) संबंधित प्रगणकाने जवळच्या घरयादी गटामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. त्याचे उदाहरण **<u>परिशिष्ट 1</u>** मध्ये दिले आहे. प्रत्येक पर्यवेक्षकीय मंडळातील सलग गटांचे स्पष्ट सीमांकन करणे आणि पर्यवेक्षकांची संख्या काढणे हे कार्य प्रत्येक चार्जमध्ये करावयाचे आहे. प्रत्येक चार्ज अधिकाऱ्याने, प्रत्येक घरयादी गट व पर्यवेक्षकीय मंडळ यांची नोंद त्यांना पुरविलेल्या ग्रामीण चार्ज रजिस्टरमध्ये करणे आवश्यक आहे.

9. प्रत्येक गावाचा नकाशा जनगणना निरीक्षण आणि व्यवस्थापन प्रणाली (CMMS) पोर्टल मध्ये भारताच्या महारजिस्ट्रार कार्यालयामार्फत (नकाशा विभाग) अपलोड करण्यात येईल. पर्यवेक्षक सीएमएमएस पोर्टल वरील सबंधित गावाचा नकाशा पाहून त्यांच्या पर्यवेक्षकीय मंडळातील प्रगणकास नेमून दिलेल्या घरयादी गटातील कोणताही भाग वगळला गेला नाही तसेच गाव / गावे यांचा संपूर्ण भागाचा समावेश झाल्याची खात्री करतील.

**<u>शहरी भाग</u>**

10. शहरी भागामध्ये जनगणना कार्यासाठी प्रभाग (वॉर्ड) पायाभूत घटक आहे. शहरांसाठी सुद्धा 650-800 लोकसंख्या किंवा 150-180 गणना घरे यापैकी जे जास्त असेल ते हाच निकष आहे. शहरी क्षेत्रात घरयादी गट तयार करताना नैसर्गिक भाग जसे मुख्य रस्ते, नद्या, रेल्वेलाइन्स, पालिकेचे प्रभाग एक दुसऱ्यांना छेदत नाही, याची काळजी

घ्यावी. हे ही लक्षात ठेवणे जरूरी आहे कि, निवडणूक भाग (मतदान प्रभागाची सीमा) शक्यतो तसेच ठेवावे. त्यासाठी मतदान प्रभाग अधिकाऱ्यांची (BLO) सुद्धा मदत घ्यावी. मतदान अधिकाऱ्याची प्रगणक म्हणून नेमणूक झाली नाही, याची खात्री करून घ्यावी. मतदान प्रभागाची सीमा (भाग क्रमांक) आणि मतदान प्रभाग अधिकारी (BLO) यांच्या नावाची माहिती चार्ज रजिस्टरच्या शेरा या रकान्यात लिहावी. चार्ज अधिकारी निवडणूक प्रकियेमध्ये सुद्धा कार्यरत असतात. निवडणूक प्रभागाची सर्व माहिती चार्ज कार्यालयामध्ये उपलब्ध असते. गटाचे आरेखन संपूर्ण क्षेत्राचे समावेशन निश्चित करण्यासाठी नैसर्गिक भाग, विभाग किंवा प्रभाग इ. विचारात घेऊन गट तयार करावा. ग्रामीण भागा प्रमाणे शहरांच्या प्रभागामध्ये कोणताही घरयादी गट तहसिलच्या सीमा भेदत नाही याची खात्री करावी.

11. ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागात देखील सहा किंवा सहापेक्षा जास्त सलग घरयादी गटाचे पर्यवेक्षकीय मंडळ तयार करून पर्यवेक्षक नेमावयाचा आहे. प्रत्येक पर्यवेक्षकीय मंडळातील सलग गटांचे स्पष्टपणे सीमांकन करणे आणि पर्यवेक्षकांची संख्या काढणे शक्य होईल. प्रत्येक चार्ज अधिकाऱ्यांने प्रत्येक घरयादी गट व पर्यवेक्षकीय मंडळ यांची नोंद त्यांना पुरविलेल्या शहरी चार्ज रजिस्टरमध्ये करणे आवश्यक आहे.

12. जनगणना संचालनालय संबंधित शहरी चार्ज अधिकाऱ्याच्या मदतीने प्रत्येक प्रभागाचा नकाशा सीएमएमएस (CMMS) पोर्टलवर अपलोड करतील. पर्यवेक्षक संबंधित प्रभागाचे नकाशा /नकाशे सीएमएमएस पोर्टलवर पाहून घरयादी गटामधील कुठलाही भाग सुटलेला नाही व प्रभागाचे संपूर्ण क्षेत्राचे समावेशन झाल्याची खात्री करेल.

13. ग्रामीण व शहरी दोन्ही भागात एस.आर.एस. (SRS) गट घरयादी गट म्हणून जसा आहे तसाच ठेवावा. (अशा प्रकरणामध्ये 650-800 लोकसंख्येच्या निकषाचा अपवाद केला जाऊ शकतो.) तसेच संविधानिक शहराचे घरयादी गट तयार करताना झोपडपट्टी क्षेत्राची स्वतंत्र ओळख ठेवावी, याविषयी परिपत्रक क्रमांक 3 मध्ये सविस्तरपणे वर्णन केले आहे. जनगणना शहराला (सेन्सस टाऊन) कोणताही प्रभाग नसतो, अशा बाबतीत संपूर्ण जनगणना शहराला एकच प्रभाग मानावे.

14. मुलभूत निकष वापरुन घरयादी गट तयार करतांना येथे नमूद करणे आवश्यक आहे की, जनगणना 2021 च्या घरयादी कार्या सोबतच एनपीआर डेटाबेस अद्ययावत करावयाचा आहे. एकच प्रगणक तिला / त्याला ज्या घरयादी गटाचे काम दिले आहे त्याच गटांसाठी ही दोन्ही कार्ये करेल. जनगणना 2011 च्या घरयादी कार्याचे वेळी गोळा केलेला आणि 2015 मध्ये अद्ययावत केलेला एनपीआर डाटा जनगणना 2011 च्या प्रत्येक घरयादी गटासाठी उपलब्ध आहे. जनगणना 2011 च्या काही घरयादी गटांची लोकसंख्या जनगणना 2011 च्या प्रगणकांच्या सर्वसाधारण कार्यभारापेक्षा जास्त कार्यभार असलेले घरयादी गट, लोकसंख्या गणनेचे वेळी उपगटांमध्ये विभाजित करण्यात आले होते व इतर घरयादी गट तसेच ठेवण्यात आले होते. यामुळे जनगणना

2011 चा प्रत्येक प्रगणक गट हा घरयादी गट किंवा घरयादी गटाच्या काही भागापासून तयार झाले तसेच घरयादी गट व प्रगणक गट यांत समन्वय राखला गेला. यामुळे वर नमूद केलेले मुलभूत निकष विचारात घेत शहरी व ग्रामीण क्षेत्रात जनगणना 2021 चे घरयादी गट तयार करतांना जनगणना 2011 च्या प्रगणक गटांच्या सीमा भेदल्या जाऊ नयेत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने जनगणना 2021 चे घरयादी गट तयार करतांना संबंधित चार्ज अधिकाऱ्यांनी खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेणे आवश्यक आहे.

(अ) जनगणना 2011 मध्ये ज्या गावांची किंवा शहरातील प्रभागांची लोकसंख्या 650-700 किंवा कमी असेल अशा गाव किंवा प्रभागांसाठी एक घरयादी गट व एक प्रगणक गट तयार करण्यात आला असेल. लोकसंख्येच्या सामान्य दरवाढीचा विचार करून सध्याची अंदाजित लोकसंख्या (जनगणना 2011 नंतर मोठ्याप्रमाणावर नवीन बांधकामे किंवा नवीन वसाहती निर्माण झाल्या नसल्यास), प्रत्येक गाव / प्रभागासाठी 800 किंवा त्यापेक्षा कमी असू शकते. अशावेळी जनगणना 2011 नुसार संपूर्ण गाव / प्रभागाकरिता एक घरयादी गट व एक प्रगणक गट सारखाच जनगणना 2021 साठी एक घरयादी गट तयार करावयाचा आहे.

(ब) जनगणना 2011 मध्ये संपूर्ण गावात किंवा शहराच्या प्रभागामध्ये एक प्रगणक गट असला तरीही गावातील किंवा शहराच्या वॉर्डातील सध्याची अंदाजित लोकसंख्या 800 (प्रगणकांचा सर्व साधारण कार्यभार) पेक्षा जास्त असल्यास जनगणना 2011 करिता गाव / प्रभागासाठी एकच प्रगणक असले तरीही 2021 साठी एकापेक्षा जास्त घरयादी गट तयार होतील.

(क) 2011 च्या जनगणनेसाठी एखाद्या गावात किंवा प्रभागामध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त प्रगणक गट असल्यास, प्रत्येक प्रगणक गटाची सध्याची अंदाजित लोकसंख्या विचारात घेऊन जनगणना 2011 चा प्रगणक गटच जनगणना 2021 चा घरयादी गट होऊ शकतो की नाही हे चार्ज अधिकाऱ्यांनी ठरवावे. जनगणना 2021 चे घरयादी गट तयार करतांना जनगणना 2011 च्या प्रगणक गटांत एकापेक्षा जास्त घरयादी गट पद्धतशीरपणे म्हणजे नैसर्गिक वैशिष्ट्ये (रस्ता, कालवा, नैसर्गिकपाडा (Hamlet) विचारात घेऊन घरयादी गटाच्य सीमा सुस्पष्टपणे ओळखता येतील तसेच कार्यभार विचारात घेऊन प्रगणकांच्या सेवांचा पर्याप्त (Optimal) वापर करता येईल हे पहावे.

**उदाहरण:- जनगणना 2011 च्या एखाद्या प्रगणक गटाची लोकसंख्या 800 आहे व सध्याची अंदाजित लोकसंख्या 1000 आहेत तर अशा स्थितीत दोन घरयादी गट (HLB) तयार केले जातील, त्यापैकी एक 700-800 लोकसंख्या असलेला (प्रगणकाचा कार्यभार) आणि प्रत्येक घरयादी गटाची नैसर्गिक सीमा विचारात घेवून उर्वरीत भागासाठी आणखी एक लहान घरयादी गट तयार करावा. मोठया घरयादी गटासाठी एक प्रगणक नेमावा**

**तर दुसऱ्या प्रगणकास लहान घरयादी गट व जवळपासचा इतर घरयादी गट प्रगणकाचा वाजवी कार्यभार विचारात घेऊन देण्यात यावा.**

**जनगणनेची आकडेवारी प्रत्येक गाव / प्रभाग स्तरावर प्रकाशित करण्यात येत असल्याने, दोन व अधिक गावे / प्रभाग यांचे भाग एक घरयादी गट (एका प्रगणकाच्या कार्यभारानुसार) तयार करतांना एकत्र होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे.**

(ड) जनगणना 2021 घरयादी गट तयार करतांना चार्ज अधिकारी प्रथम जनगणना 2011 च्या विविध प्रगणक गटाच्या सीमा, सध्याची अंदाजित लोकसंख्या व खालील सामग्रीचा वापर करतील.

- जनगणना 2011 प्रगणक गटाचा मांडणी दर्शक नकाशा (Layout).
- लोकसंख्या गणना 2011 चा पर्यवेक्षकीय मंडळाचा नकाशा.
- जनगणना 2011 संक्षिप्त घरयादी (AHL)
- 2011 चार्ज रजिस्टर लोकसंख्या गणना ज्यात सीमा आणि प्रगणक गट निहाय 2011 ची लोकसंख्या.
- एन.पी.आर. रेकॉर्ड 2015 / 2010 नुसार कुटुंबप्रमुखांची यादी पत्त्यासह.
- जनगणना देखरेख व कार्यप्रणाली पोर्टलवर एन.पी.आर. कुटुंबनिहाय लोकसंख्या उपलब्ध आहे.
- जनगणना 2011 च्या प्रगणक गटांच्या सीमा सुलभतेने ओळखण्यासाठी स्थानिक भागांची माहिती असलेल्या चार्जमधील सहायकांचे सहकार्य.
- जनगणना 2011 च्या प्रगणक गटांतील नवीन बांधकामे व वस्त्यां यांचे परिणाम.

14. (इ) संबंधित चार्ज अधिकाऱ्याने घरयादी गट तयार करता एखाद्या गावात / प्रभागातील कोणताही भाग सुटला नाही याची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे रिक्त जमीन / शेती योग्य जमीनींवर विकसित झालेल्या निवासी व अनिवासी इमारती, ज्यांचा समावेश जनगणना 2011 च्या प्रगणक गटांत झालेला नव्हता, त्या सर्व इमारतींचा समावेश जनगणना 2021 च्या नजीकच्या अथवा नवीन घरयादी गटात झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

14. (फ) वर नमूद केल्यानुसार घर यादी गट तयार करण्याच्या मार्गदर्शक सूचनांचे अनुसरण करून 2011 च्या प्रगणक गटांचे विभाजन व वाटप सी.एम.एम.एस. (CMMS) पोर्टल मार्फत करावयाचे आहे. याबाबत जनगणना 2021 व्यवस्थापन व देखरेख प्रणाली वापरण्याविषयी माहिती पुस्तिकामध्ये स्पष्टीकरण केले जाईल.

**<u>घरयादी गटांना क्रमांक देणे</u>**

15. प्रत्येक गाव/ शहरात एक किंवा अधिक घरयादी गटांचा समावेश असतो. चार्जमधील जनगणना 2021 करिता तयार करण्यात आलेल्या घरयादी गटात, जनगणना 2011

च्या संबंधित प्रगणक गटाच्या संपूर्ण क्षेत्राचा समावेश असला तरीही जनगणना 2011 च्या प्रगणक गटाचाच क्रमांक लागू होऊ शकत नाही कारण,

1. प्रगणक गटाचा (EB) क्रमांक सहा अंकी असतो तर घरयादी गट क्रमांक हा चार अंकी असतो.
2. जनगणना 2011 च्या प्रगणक गटांमध्ये कार्यभार वाढल्याने अनेक घरयादी (HLB) गट निर्माण होऊ शकतात.
3. जनगणना 2011 च्या प्रशासकीय घटकांमध्ये क्षेत्र वाढले किंवा कमी झालेले असू शकते.

तरीही एका चार्जमधील (ग्रामीण/शहरी) अशा सर्व घरयादी गटांना सलग चार अंकी अनुक्रमांक देण्यात यावे. जसे 0001, 0002, 0003, ...... 0099 आणि त्यापुढे. एखाद्या शहरामध्ये एकापेक्षा अधिक चार्ज असतील तर प्रत्येक चार्जमधील घरयादी (HLB) गटांना सलग अनुक्रमांक द्यावेत. ग्रामीण चार्जमध्ये गाव संकेतांकाच्या चढत्या क्रमानुसार घरयादी गटांना अनुक्रमांक द्यावेत. अशाप्रकारे शहरी चार्ज प्रभागाच्या चढत्या क्रमांकानुसार घरयादी (HLB) गटांना अनुक्रमांक द्यावेत. घरयादी (HLB) गटांना क्रमांक देण्यासाठी गाव संकेतांक / शहर / प्रभाग संकेतांक आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येतील.

16. यापूर्वीच्या परिच्छेदात चर्चा केल्याप्रमाणे राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर अद्ययावत करण्याचे कार्य घरयादी कार्यासोबतच केले जाईल. यासाठी जनगणना 2011 च्या घरयादी कार्यावेळी गोळा केलेली राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टरची माहिती व 2015 मध्ये अद्ययावत केलेली माहिती संबंधित प्रगणकाला पुरवली जाईल. याकरिता 2011 चा प्रगणक गट आणि जनगणना 2021 च्या घरयादी (HLB) गट यांत सुसंगतता (Concordance) राखण्याची आवश्यकता आहे म्हणून सर्व चार्ज आधिकाऱ्यांनी जनगणना 2021 च्या घरयादी (HLB) गट क्रमांकाचा प्रशासकीय तपशील विहित नमुन्यात (परिशिष्ट - 2 ) दर्शविणे आवश्यक आहे.

**<u>घरांना क्रमांक देणे</u>**

17. ज्या ठिकाणी स्थानिक प्राधिकरणाने योग्य घर क्रमांक दिले त्या ठिकाणी तेच घरक्रमांक घरयादी गट तयार करताना वापरण्यात यावेत. ज्या ठिकाणी अशा प्रकारे क्रमांक दिलेले नसतील तेथे जनगणनेसाठी नव्याने घरांना क्रमांक देणे आवश्यक आहे. गाव आणि शहरांतील प्रगणकांना कार्यभारानुसार कामाचे समान वाटप करणे तसेच कुठलेही क्षेत्र वगळले जाऊ नये किंवा दोनदा समाविष्ट होऊ नये याकरिता हे आवश्यक आहे. ग्रामीण व शहरी प्राधिकरणाकडून घरांना क्रमांक देण्यात येतात. याबाबतचे पत्र राज्यांच्या मुख्य सचिवांना देण्यात आले आहे. घरांचे क्रमांक लाल रंगामध्ये CEN लिहून दिले जावेत. **उदा.** CEN 0001, CEN 0002 इत्यादि. सदर क्रमांक साधारण दोन मीटर अंतरावरून दिसले पाहिजेत. तसेच सदर क्रमांक दरवाजाच्या बाजूला ठळकपणे दिसण्यायोग्य लिहावे. हे

क्रमांक कायम स्वरूपी असावेत. दिलेले क्रमांक लवकर नाहीसे होणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी. (**उदाहरणार्थ** - खडूने दिलेले क्रमांक / मार्करने दिलेले क्रमांक ).

18. ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागातही जेथे कायमस्वरूपी घरक्रमांक स्थानिक प्राधिकरणाकडून देण्यात आले असल्यास घरयादी गट तयार करताना तेच घरक्रमांक वापरण्यात यावेत. लोकसंख्येच्या निकषानुसार एक किंवा अधिक क्षेत्रे मिळून घरयादीचा गट तयार करावा. शहरांमध्ये घरांना क्रमांक दिलेले नाहीत अथवा काही भागातच घर क्रमांक दिलेले आहेत असे दिसून येते. असे घर क्रमांक घरयादी कार्यासाठी वापरता येणार नाहीत. अशा परिस्थितीत नगरपालिका / स्थानिक आधिकाऱ्यांनी कोणताही भाग न वगळता किंवा दोनदा समाविष्ट होऊ नये यासाठी घरयादी गट तयार करण्याकरिता आधीच घरांना क्रमांक द्यावेत. हे लक्षात असू द्या की, सर्व भागांत घरांना क्रमांक देणे आवश्यक आहे. अनेकदा असे आढळून येते, झोपडपट्टया व अवैध वसाहती (Colonies) इत्यादींना क्रमांक देण्यास स्थानिक संस्था उत्सुक नसतात. अशा परिस्थितीत पर्यवेक्षक व प्रगणकाने घरांना क्रमांक देण्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

19. ग्रामीण आणि शहरी भागात हे स्पष्ट केले पाहिजे की, जनगणने दरम्यान दिलेल्या क्रमांकामुळे (घरे / वस्त्या) नियमित करण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. हे केवळ जनगणनेचे कार्य सुलभ करण्यासाठी आहे. घरयादी व घरगणना सूचना पुस्तिकेतील घर क्रमांकाबाबतच्या सूचनांची प्रत <u>परिशिष्ट - 3</u> मध्ये दिली आहे.

20. घरयादी गट तयार करण्याच्या प्रक्रीयेतील मार्गदर्शक सूचनांतील ठळक मुद्दे संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे आहेत.

    1. जनगणना 2021 च्या घरयादी गटाच्या सीमा व जनगणना 2011 प्रगणक गटाच्या सीमा भेदल्या जाणार नाहीत.
    2. घरयादी गटाचा आकार साधारणत: 650-800 लोकसंख्या किंवा 150-180 गणना घरे यापैकी जे जास्त असेल तो असावा.
    3. प्रत्येक गाव (ओसाड गावांसह) त्या गावाची लोकसंख्या कितीही असली तरी त्या गावात कमीत कमी एक घरयादी गट असावा.
    4. प्रत्येक गटाच्या सीमा सुस्पष्ट असाव्यात.
    5. महसुली गाव / ग्राम पंचायत सीमा भेदल्या जाऊ नयेत. शक्य असल्यास ग्रामीण भागात मतदान केंद्राची हद्द आबाधित ठेवावी.
    6. शहरी भागात घरयादी गटाच्या सीमा व नैसर्गिक विभाग, प्रभाग किंवा शहरांच्या सीमा भेदल्या जाऊ नयेत. शक्य असल्यास शहरी भागात मतदान केंद्रांची हद्द आबाधित ठेवावी.
    7. जनगणना 2011 चे SRS गट, त्यात कोणताही बदल न करता जनगणना 2021 करिता वापरण्यात यावेत.

8. सर्व संविधानिक शहरांमध्ये लोकसंख्या विचारात न घेता, झोपडपट्टी गट तयार करणे आवश्यक आहे. झोपडपट्टी व झोपडपट्टी व्यतिरिक्तच्या भागांचा समावेश करून एक घरयादी गट तयार करू नये.
9. एका प्रगणकाला घरयादी गटाच्या आकारमानानुसार मात्र सलग असलेले एकापेक्षा जास्त घरयादी गट नेमून दिले जाऊ शकतात.
10. सहा प्रगणकांना नेमून दिलेले सहा किंवा अधिक सलग घरयादी गट मिळून एक पर्यवेक्षकीय मंडळ तयार होईल.
11. प्रत्येक घरयादी गटाच्या सीमा चार्ज अधिकाऱ्यानी चार्ज रजिस्टर मध्ये स्पष्टपणे लिहाव्यात.
12. जनगणना 2011 चे प्रगणक गट आणि जनगणना 2021 चे घरयादी गट यांच्यातील सुसंगतता दर्शवणारे परिशिष्ट - 2 चार्ज कार्यालयात तयार करावे.

11/02/20

( रश्मी प्रि. झगडे, भाप्रसे )
संचालक,
जनगणना संचालनालय, महाराष्ट्र

प्रति,
1. प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी (सर्व)
2. आयुक्त, महानगर पालिका (सर्व)
3. शहर जनगणना अधिकारी (सर्व)
4. चार्ज अधिकारी व (ग्रामीण) तथा तहसिलदार
5. चार्ज अधिकारी (शहर) तथा मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद / नगर पंचायत

प्रत महितीस्तव सादर :-
2. प्रधान सचिव, साप्रवि, मंत्रालय, मुंबई.
3. प्रधान सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई.
4. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
5. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
6. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

परिशिष्ट 1

# भारताची जनगणना 2021

## पर्यवेक्षकीय सर्कल नकाशा

**ओळख तपशील ः**

राज्य/संघराज्य ................................ संकेतांक

जिल्हा ........................................ संकेतांक

तहसिल/तालुका/पोलिस ठाणे/ विकास गट/
परिमंडळ/मंडळ इत्यादी.............. संकेतांक

शहर ..........................................संकेतांक

चार्ज चे नाव..............................................

**पर्यवेक्षकीय सर्कल क्रमांक**

**पर्यवेक्षकाचा तपशील :**

i) नाव ...........................................................

ii) पद ...........................................................

iii) कार्यालय पत्ता ..................................................

iv) फोन नंबर एस टी डी कोडसह ................................

v) मोबाईल नंबर......

vi) प्रदान केलला प्रशिक्षण भत्ता ...................................

vii) प्रदान केलले मानधन ..............................................

दर्शवावे : नकाशात सर्व प्रगणक गटांच्या सीमा आणि प्रत्येक गटात प्रमुख भूचिन्ह.
नकाशाच्या आजुबाजूना पर्यवेक्षकीय सर्कल क्रमांक/प्रत्येक सीमेला चार्जचे नाव




टीप : जर प्रगणकाला एकापेक्षा जास्त प्रगणक गट नेमून दिलेले असतील तर प्रत्येक प्रगणक गट/ उपगटाचे भरलेले साहित्य वेगवेगळया प्लॅस्टिक फोल्डरमध्ये ठेवावेत.
जनगणना अधिकाऱ्याद्वारे तपासणीसाठी प्रत्येक पर्यवेक्षक त्याने/तिने पुस्तिका अद्ययावत करावी आणि जवळ ठेवावी.
पर्यवेक्षकाला दिलेल्या गाव/वॉर्ड/GIS नकाशे त्याने त्याच्या पर्यवेक्षकीय सर्कलच्या सीमा आणि पर्यवेक्षकीय सर्कलच्या अंतर्गत येणारे प्रगणक गट दाखविण्यासाठी त्याने/तिने वापरावेत.
पर्यवेक्षकीय सर्कलचे सर्व रेकॉर्ड भरलेल्या पत्रकांसह चार्ज अधिकाऱ्याला सुपुर्द करावेत.
पर्यवेक्षकाने पर्यवेक्षकीय सर्कलच्या पुस्तिकेच्या शेवटी अनिवार्य प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

पर्यवेक्षकाची दिनांकासह स्वाक्षरी ........................................................

# परिशिष्ट - 2

## चार्जमधील जनगणना 2011 चे प्रगणक गट व जनगणना 2021 चे संबंधित घरयादी गट यातील सुसंगतता दर्शविणारे विवरण

राज्याचे नाव ------------------------------------------ जिल्ह्याचे नाव ----------------------------- तहसिलचे नाव / शहर -------------------------------------

| जनगणना 2011 | | | | | | | | जनगणना 2021 | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | जिल्ह्याचे संकेतांक | तहसिल | तहसिल चा संकेतांक | गाव/ शहराचे नाव | गाव/ शहराचा संकेतांक | प्रभाग क्रमांक | (सहा अंकी) प्रगणक गट (EB) | जिल्हा | जिल्ह्याचे संकेतांक | तहसिल | तहसिल चा संकेतांक | गाव/ शहराचे नाव | गाव/ शहराचा संकेतांक | प्रभाग क्रमांक | (चार अंकी) घरयादी गट (HLB) | शेरा |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

टीप : केवळ शॉर्ट्स कोड्स वापरावेत

## घर क्रमांक देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे
## (घरयादी व घरगणनासाठी सूचना पुस्तिके मधून गोषवारा)

**घरांना क्रमांक देण्यासाठी मार्गदर्शक सूचना :**

4.28. जनगणनेच्या हेतूने, घरांना क्रमांक देणे म्हणजे खात्री करणे की, आपल्या घरयादी गटातील प्रत्येक इमारत आणि गणनाघरास क्रमबद्ध क्रमांक दिला आहे आणि इमारत क्रमांक व त्यामधील गणना घरांची संख्या हे मांडणीदर्शक नकाशात दाखविण्यात आले आहेत. आपल्या घरयादी गटातील इमारतींना आणि गणना घरांना क्रमांक देत असताना हे लक्षात घ्या की, गणना घरांसाठी / इमारतींसाठी क्रमांक देताना पत्रकामध्ये दर्शविलेल्या अंकांचाच वापर करावा.

**(अ) इमारतींना क्रमांक देणे :**

4.29. घरयादी गटातील इमारतींना क्रमांक देताना खालील तीन प्रकारच्या परिस्थिती आढळण्याची शक्यता आहे.

i) जेथे पालिका किंवा स्थानिक प्राधिकरणाने इमारतींना किंवा गणना घरांना पद्धतशीरपणे क्रमांक दिलेले आहेत;

ii) जेथे मोकळ्या जागांना मालमत्तेच्या आधारे क्रमांक दिलेले असतील परंतु त्यांतील बऱ्याच जागांवर अद्याप बांधकाम झालेले नसेल, किंवा जेथे इमारत क्रमांक आहेत परंतु ते अपूर्ण आणि पद्धतशीर नाहीत, आणि

iii) इमारतींना क्रमांक दिलेला नाही.

पहिल्या परिस्थितीमध्ये इमारतींना स्थानिक प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या क्रमांकांचा अवलंब आपण करू शकता. तसेच नवीन इमारतींना, ज्या इमारती क्रमांक दिल्यानंतर झाल्या असतील, त्यांना पोट क्रमांक / नवीन क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, जर क्रमांक न दिलेली इमारत किंवा नवीन इमारत ही क्रमांक 10 व 11 क्रमांकांच्या मध्ये आली असेल तर त्या इमारतीला 10/1 हा क्रमांक द्यावा. म्हणजे याचा अर्थ असा आहे की, एक वेगळी इमारत, इमारत क्रमांक 10 च्या नंतर आली आहे. ज्या परिस्थितिमध्ये स्थानिक प्राधिकरणाने दिलेल्या क्रमांकाच्या बाबतीत शेवटचा क्रमांक 120 असेल तिथे स्थानिक प्राधिकरणाने दिलेल्या क्रमांकाच्या पुढील, नवीन क्रमांक '121' द्यावा. दुसऱ्या व तिसऱ्या परिस्थितीसाठी आपल्याला असे सूचित करण्यात यते की, इमारतींना गणना क्रमांक द्यावेत.

**काही विशिष्ट परिस्थिती :**

(i) जर घरयादी गटामध्ये पुष्कळशा गल्ल्या असतील : विविध गल्ल्यांतील इमारतींना सलग मालिकेत क्रमांक द्यावेत. गल्ल्यांची सुरुवात सलग क्रमाने वायव्येकडून (उत्तर-पश्चिम) ते आग्नेयकडे (दक्षिण-पूर्व) घ्यावी. इमारतींना क्रमांक देण्याची सर्वात उत्तम पद्धत म्हणजे गल्लीच्या एका बाजूपासून सुरुवात करून सलग क्रमांक देत जावे आणि गल्लीच्या शेवटी, दुसऱ्या बाजूला (गल्ली) ओलांडून जाण्यापूर्वी, त्या बाजूने क्रमांक पूर्ण

करून त्याच मालिकेत (क्रमांक) चालू ठेवावा आणि शेवटी, जिथे पहिला क्रमांक दिला त्याच्या समोर, काम पूर्ण करावे. म्हणजे जिथे पहिला क्रमांक दिला आहे त्याच्या समोर शेवटचा क्रमांक येईल.

(ii) जर घरयादी गट किंवा घरयादी गटाच्या भागात वस्त्यांची मांडणी अशी असेल की, इमारती विखुरलेल्या असतील किंवा एकत्र असतील किंवा इतरांपासून दूर जागेत असतील, जसे; शेतात, गावाच्या / घरयादी गटाच्या सीमेजवळ, रेल्वे लाइनच्या किंवा तलाव / नदी / नाला यांच्या बाजूने या बाबतीत शक्य असेल तितके नमूद केलेल्या वरील (i) च्या प्रमाणे इमारत क्रमांक देणे. जर नमूद केलेल्या वरील (i) च्या प्रमाणे करणे शक्य नसेल तर सर्व इमारतींना क्रमांक दिले आहेत याची खात्री करावी आणि जसे इमारत क्रमांक दिले असतील त्याप्रमाणे इमारतींची दिशा नकाशात बाणाने दाखवावी.

(iii) शहरी घरयादी गटाच्या बाबतीत, गल्लीच्या सरळ दिशेने इमारतींना क्रमांक देत जावे, कोणत्याही इतर भौगोलिक दिशेने क्रमांक देऊ नयेत.

(iv) ज्या इमारतीचे बांधकाम चालू आहे, जिचे छप्पर बांधून तयार झालेले आहे, तिला (इमारतीस) सलग मालिकेत अनुक्रमांक द्यावा.

(v) एखाद्या भाजी मार्केट / मंडईत जी दुकाने असतात त्यांना काही वेळा सामायिक छप्पर असते परंतु चारही बाजूंना भिंती नसतात. काही ठिकाणी खांबावर ताडपत्री / प्लास्टीक किंवा सिमेंटचे छप्पर आढळते. काही ठिकाणी 3 फुटांचे पोटमाळे असतात आणि त्यावर दुकानदार रात्रीच्या वेळी झोपतात. अशा ठिकाणांना इमारती मानून त्याप्रमाणे क्रमांक द्यावा.

**ब) गणना घरांना क्रमांक देणे :**

4.30. प्रत्येक गणना घराला क्रमांक देण्यासाठी क्रमश: 0001 पासून सुरुवात करावी. यासाठी घरयादी आणि गणना घर पत्रकामध्ये दिलेल्या रकाना क्र. 3 च्या खाली 4 चौकोन दिलेले आहेत. गणना घर क्रमांक हे इमारत क्रमांकापेक्षा वेगळे असू शकतात.

गणना घराला क्रमांक देण्याची उदाहरणे : -

| पालिका / स्थानिक प्राधिकरण इत्यादीद्वारा दिलेले इमारत क्रमांक | गणना घरांची संख्या | गणना घर क्रमांक |
|---|---|---|
| A - 101 | 2 | 001, 002 |
| A - 102 | 3 | 003, 004, 005 |
| A - 103 | 4 | 006, 007 |

4.31 जर घरांना क्रमांक दिल्यानंतर एखादी नवीन इमारत किंवा गटाच्या मध्ये इमारत आढळली तर तिला नवीन क्रमांक देऊन उपक्रमांक द्यावा, अशा गणना घरांना जो शेवटचा क्रमांक आहे त्याच्या पुढचा क्रमांक द्यावा.

उदाहरणार्थ, जर इमारत क्रमांक 10 व 11 च्या मध्ये दोन गणना घरे असलेली एक नवीन इमारत आढळली आणि गणना घरांसाठी शेवटचा अनुक्रमांक 0153 दिला असेल तर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नवीन इमारतीस 10/1 असा पोट / उपक्रमांक देऊन गणना घरांचे क्रमांक 0154 व 0155 असे द्यावेत. इमारत क्रमांक 10/1 म्हणजे इमारत क्रमांक 10 व 11 यांच्या मध्ये आढलेली नवीन इमारत असे समजावे.

<table>
<tr><th>इमारत क्रमांक</th><th>जनगणना घरांची संख्या</th><th>जनगणना घर क्रमांक</th></tr>
<tr><td rowspan="2">10/1</td><td rowspan="2">2</td><td>0154</td></tr>
<tr><td>0155</td></tr>
</table>

4.40 आपणास दिल्या गेलेल्या, जास्त काळ टिकणाऱ्या सामग्रीने इमारतीच्या आणि गणना घराच्या मुख्य ठिकाणी क्रमांक लिहावयाचे आहेत. उदाहरणार्थ, जर इमारत क्र. A-102 मध्ये 0003, 0004 आणि 0005 अशी तीन गणना घरे असतील तर इमारत / गणना घरांवर दर्शनी भागात खाली दर्शविल्याप्रमाणे नोंदवावे.

<table>
<tr><td>इमारत क्रमांक गणना घर क्रमांकासह इमारतीच्या मुख्य दरवाजा / प्रवेशद्वारावर खालील चौकोनात दर्शविल्याप्रमाणे लिहावेत.<br><br>A -102<br>0003 - 0005</td><td>प्रत्येक गणना घराच्या प्रवेशद्वारावर गणनाघर क्रमांक खालील चौकोनात दर्शविल्याप्रमाणे द्यावयाचे आहेत.<br><br>0003   0004   0005</td></tr>
</table>